# प्रेस नोट दि.०९/१०/२०१७

## (बेकायदेशिर अग्नीशस्त्र बाळगणा-यास गुन्हे शाखेचे गुंडा स्कॉड दक्षिण विभागाने केले अटक )

---

पुणे शहर गुन्हेशाखे कडील संघटीत गुन्हेगारी विरोधी पथक दक्षिण विभागा मध्ये कार्यरत असणारे पोनिरी श्री.राम राजमाने व त्यांचा स्टाफ हे दि.०७/१०/२०१७ रोजी वारजे माळवाडी पोलीस स्टेशनचे हद्दीत गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग फिरत असताना फिरत फिरत वारजे माळवाडी पोलीस स्टेशन हद्दीच्या रामनगर झोपडपट्टी भागात १४/२५ वा चे सुमारास वारजे माळवाडी रामनगर येथे आले असता स्कॉड मधील पोलीस कर्मचारी प्रशांत पवार यांना त्यांचे बातमीदारा कडुन बातमी मिळाली कि, डावरे रेशनिंगचे दुकानाचे शेजारी,रामनगर, वारजे माळवाडी पुणे येथे अजय कदम त्याने अंगात मेंहदी व निळे रंगाचे पटटयाचा टि शर्ट व निळे रंगाची जीन्स घातलेला असून त्याच्याकडे गावठी पिस्टल असुन तो विक्री साठी चालला होता. अशी खात्रीशीर बातमी मिळाली. सदरचे बातमीप्रमाणे खात्री करता बातमीप्रमाणे वर्णनाचा इसम मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेऊन नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव अजय रघुनाथ कदम वय -३४ वर्षे रा- रामनगर वारजे डावरे रेशनिंग दुकानाचे मागे वारजे माळवाडी पुणे असे सांगीतले. त्याचेकडे डावे कमरेला जीन्स पॅन्टमध्ये खवलेले गावठी पिस्टल मिळाले. देशी बनावटीचे गावठी पिस्टल चेक करता त्याचे मॅगजिन मध्ये एक जिवंत काडतुसे मिळाले. असा एकुण मिळुन २५,५००/- चा मुद्देमाल गुन्हयाचे अनुषंगाने जप्त करण्यात आला आहे. त्याचे विरुध्द प्रशांत पवार यांनी वारजे माळवाडी पो.ठाणे गु.र.न.३७४/२०१७ आर्म अॅक्ट कलम ३ (२५) व मुंबई पोलीस अॅक्ट कलम ३७ (१), सह १३५ प्रमाणे फिर्याद दिली आहे. गुन्हा दाखल करणेत आला असुन तपासकामी त्याची मा.न्यायालयातुन पोलीस कस्टडीची रिमांड घेणेत आली आहे. **गुन्हयाचा पुढील तपास सहा.पोलीस फौजदार राजेंद्रसिंग चौहान हे करित आहेत.**

**सदरची कामगिरी गुन्हे शाखा, पुणे शहरचे श्री.प्रदिप देशपांडे सो-अपर पोलीस आयुक्त, गुन्हे., श्री.पंकज डहाणे सो,पोलीस उप आयुक्त,गुन्हे.श्री.सुरेश भोसले सो-सपोआ,गुन्हे-१, यांचे मार्गदर्शनाखाली गुंडा स्कॉड दक्षिण विभागाचे पोलीस निरीक्षक श्री.राम राजमाने, सहा.पो.फौज.राजेंद्रसिंग चौहान, प्रविण तापकीर, प्रशांत पवार, गणेश साळुकें, विवेक जाधव, अजय उत्तेकर, किरण ठवरे, कैलास साळुके, प्रविण पडवळ, नितीन रावळ, राकेश खुणवे, रमेश चौधर, संभाजी गंगावणे यांनी केली आहे.**